# प्राच्यविद्या अभ्यास संस्था, ठाणे

रजिस्ट्रेशन नं. : ट्रस्ट ॲक्ट एफ् १०३४-ठाणे १४ मार्च १९८४
सोसायटीज् ॲक्ट एम्.ए.एच्./११२४/ठाणे २१/१२/१९८३

# निवेदन

## २००८

'शिवशक्ती'
डॉ. बेडेकर हॉस्पिटल,
महर्षी कर्वे पथ, नौपाडा, ठाणे ४०० ६०२.
दूरध्वनी : २५४२ १४३८ फॅक्स : २५४४ २५२५
e.mail - vbedekar@yahoo.com
URL : http://www.orientalthane.com

# प्राच्यविद्या अभ्यास संस्था, ठाणे

बंधु-भगिनींनो,

प्राच्यविद्या अभ्यास संस्था, ठाणे, ही संस्था प्रामुख्याने भारतीय संस्कृती, रीतिरिवाज, परंपरा, मूल्ये, विचारधारा व संस्कृतभाषा यांचा अभ्यास व प्रसार करते. संस्था सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट व बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट खाली नोंदणीकृत आहे.

सोई करिता जगाचे पूर्व व पश्चिम असे दोन भाग पाडले गेले आहेत. यापैकी पूर्वेकडील देशांच्या मानवी संस्कृतीचा अभ्यास प्राच्यविद्येच्या कक्षेत येतो. मानवाच्या अस्तित्वाकरिता लागणाऱ्या सर्व घटनांचा यामध्ये समावेश होतो. या अभ्यासामध्ये भारताविषयीच्या अभ्यासाला 'भारतशास्त्र' (Indology) इजिप्तविषयीच्या शास्त्राला 'इजिप्तशास्त्र' (Egyptology) चीनबद्दलच्या अभ्यासाला 'चिनी अभ्यास' (Sinology) असे म्हटले जाते.

सर्वसाधारणपणे समाजामध्ये असा एक गैरसमज दिसतो की ही संस्था म्हणजे फक्त इतिहासविषयक अभ्यासाची संस्था आहे. साहजिकच यामुळे, इतिहास या विषयाच्या, समाजाच्या आवडीनिवडीशी आणि त्या दृष्टिकोनातून या संस्थेच्या कार्यक्रमांकडे बघितले जाते. इतिहास या विषयाचा संस्थेत अभ्यास होत असला तरी इतिहासापुरतेच संस्थेचे कार्य मर्यादित नाही. वर्तमानाआधी घडलेल्या सर्वच भौतिक-मानवी-नैसर्गिक, घटनांची वस्तुनिष्ठ, संदर्भसापेक्ष, कालानुक्रमे नोंद म्हणजेच इतिहास. दुर्दैवाने किंवा अभ्यासाच्या सोईकरिता आज 'इतिहास' या विषयाची व्याप्ती ही राजे, लढाया, सनावळ्या इतकीच मर्यादित झालेली दिसून येते. यात काही गैर आहे असेही नाही. प्राच्य विद्येच्या अभ्यासाची व्याप्ती मात्र अधिक विशाल व इतर, इतिहासारख्याच मानववंश, भूगोल, समाजशास्त्र अशा अनेक विषयांच्या संयुक्त अभ्यासाशी निगडित आहे. भारतीय संस्कृती ही जगांत जुनी व आपले अस्तित्व टिकवून ठेवलेली संस्कृती आहे. **म्हणूनच हा विषय म्हणजे नुसता घटनांच्या क्रमाचा, राजा, व्यक्ती व भौगोलिक सीमा असलेल्या देशाच्या विजयाचा वा पराजयाचा अभ्यास नसून, संपूर्ण**

**मानव जात व निसर्ग, यांचे अस्तित्व, विकास व संतुलन याकरिता कारणीभूत झालेली मनोसामाजिक कारणे व परिस्थिती यांचा अभ्यास आहे.** इतिहास हे प्राच्यविद्येच्या अभ्यासाचे एक साधन आहे. उत्खनन, ताम्रपट, शिलालेख, नाणी, शिल्प ही सुद्धा या विषयाच्या अभ्यासाची महत्त्वपूर्ण साधने आहेत. परंतु या चाकोरीबद्ध साधनांपलिकडेही अनेक साधनांचा शोध घेऊन अभ्यास करावा लागतो. प्राच्यविद्येच्या अभ्यासाची विशालता लक्षात आल्यावर या अभ्यासाकरिता लागणाऱ्या साधनांचे अमर्याद स्वरूप लक्षात येते. आज पुणे, बडोदा, मद्रास, म्हैसूर या ठिकाणी प्राच्यविद्येच्या अभ्यासाच्या महत्त्वाच्या संस्था आहेत. मुंबईतही हा अभ्यास करणाऱ्या ४-५ संस्था आहेत. १५ लाख लोकसंख्या आणि १,५०० अधिक वर्षांची इतिहास परंपरा असलेल्या, शिलाहार नृपतींच्या या 'श्रीस्थानक' (ठाणे) शहरांत, प्राच्यविद्येच्या अभ्यासाचे केंद्र स्थापन करण्याचा संस्थेचा हा प्रयत्न आहे. या अभ्यासाकरिता प्रामुख्याने लागणाऱ्या दोन सोई म्हणजे संदर्भ ग्रंथालय. (Reference Library) व वस्तुसंग्रहालय (Museum). तसे पाहिले तर विकसित देशांतील सर्व प्रमुख शहरांतून कमीत कमीत कमी २५ ते ३० वस्तुसंग्रहालये व लाखो पुस्तकांनी भरलेली तेवढीच ग्रंथालये दिसून येतात. शहराच्या, पर्यायाने मानवाच्या विकासाचा तो एक अविभाज्य भाग समजला गेला आहे. रस्ते, दिवाबत्ती, तरण तलाव, नाट्य संकुले म्हणजेच शहराचा विकास, इतका मर्यादित अर्थ परदेशातील या शहरांच्या नागरी संस्थांनी व त्यांच्या प्रतिनिधींनी करून घेतलेला नाही. शहरातील नागरिकांच्या विकासाकरिता, कायम संदर्भ व ज्ञान उपलब्ध करून देणारी ग्रंथालये व संग्रहालये, रस्ता व तरण तलाव यांच्या इतक्याच हिरिरीने जबाबदारीचा एक भाग म्हणून या शहर संस्थांनी विकसित केलेली आहेत.

पोहण्याची, नाटक बघण्याची सोय झालेल्या ठाणेकर नागरिकाला मात्र समाजशास्त्रातील व इतर कुठल्याही जागतिक संशोधन पत्रिकेकरिता मुंबईवर अवलंबून रहावे लागते. करमणूकप्रधान शहरनियोजन कदाचित तात्पुरते आकर्षक व झटपट प्रसिद्धी देणारे ठरते, परंतु नागरिकांच्या सर्वांगीण विकासाकरिता ते परिपूर्ण ठरत नाही. हे विस्ताराने मांडण्याची गरज एवढ्याकरिताच की चांगले संदर्भ ग्रंथालय व वस्तुसंग्रहालयाच्या निर्मितीचा खर्च एखाद्या व्यक्ती व संस्थेच्या कक्षेपलिकडील आहे. बडोदा, तंजावर व पुणे येथे या संस्था तत्कालीन राजाश्रय व ब्रिटिशांची या संदर्भातील दूरदृष्टी यामुळेच उभ्या आहेत. आज सुमारे २५००० दुर्मिळ ग्रंथ, साडेतीन हजारावर हस्तलिखित पोथ्या व श्री. अण्णा शिरगांवकर यांनी सुपूर्द केलेल्या पुरातन वस्तू व शिल्पे संस्थेजवळ आहेत. ठाणे शहराचा नागरिक या प्रकल्पांकडे अधिक सहानुभूतीने पाहील तर प्रकल्पाच्या निर्मितीचे स्वप्न लवकर साकार होईल. पुढे अनेक पिढ्यांना आपल्या वैचारिक गरजा भागविण्याकरिता इतर शहरांवर अवलंबून रहावयास लागणार नाही.

## चर्चासत्रे व परिषदा

संस्थेने ३२ चर्चासत्रे व परिषदा गेल्या २५ वर्षांत भरविल्या. भारतीय संस्कृतीच्या विविध अंगांचा विस्तृत ऊहापोह या माध्यमातून करण्यात आला. देशातील सुमारे ६५० व परदेशातील २० च्या वर अभ्यासकांनी आपले शोधनिबंध या परिषदांमधून वाचले. या परिषदांचे विषय होते -

| | | |
|---|---|---|
| १) | हिंदू परंपरेतील विज्ञान व तंत्रज्ञान - | १९८२ |
| २) | हिंदू परंपरेतील गान व वाद्यकला - | १९८२ |
| ३) | हिंदू परंपरेतील नृत्य व नाट्यकला - | १९८३ |
| ४) | भारताबाहेरील संस्कृत अध्ययनाचा अभ्यास - | १९८३ |
| ५) | पाणिनीचे व्याकरण - | १९८४ |
| ६) | प्राचीन भारतातील गौण शास्त्रे - | १९८४ |
| ७) | हिंदू दैवतशास्त्रे व इतर जागतिक संस्कृतीतील दैवतशास्त्रांचा तौलनिक अभ्यास - | १९८४ |
| ८) | संग्रहालयशास्त्र - | १९८५ |
| ९) | तंत्रशास्त्र - | १९८५ |
| १०) | स्मृतिग्रंथ व त्यांमधील विचार- | १९८६ |
| ११) | प्राचीन भारतातील प्रशासन - | १९८७ |
| १२) | प्राचीन भारतातील वर्णाश्रमव्यवस्था - | १९८८ |
| १३) | पुराणवाङ्मय - | १९८९ |
| १४) | प्राचीन भारत व पर्यावरण- | १९९० |
| १५) | बृहद्भारत- (अर्थात भारतीय संस्कृतीचा भारताबाहेरील देश व संस्कृतीशी संपर्क व प्रभाव) | १९९१ |
| १६) | प्राचीन भारत व कृषी- | १९९२ |
| १७) | भारतीय परंपरेतील 'काम' या पुरुषार्थाचे स्थान- | १९९३ |
| १८) | वेदाङ्गे- | १९९४ |
| १९) | प्राचीन भारतातील शिक्षण पद्धती- | १९९४ |
| २०) | प्राचीन भारतातील कायदा व न्याय व्यवस्था- | १९९५ |
| २१) | प्राचीन भारतातील क्रीडा व करमणूक- | १९९६ |
| २२) | प्राचीन भारतातील विज्ञान व तंत्रज्ञान- | १९९७ |
| २३) | नौकाशास्त्र पुरातत्त्वीय अभ्यास २ री आंतरराष्ट्रीय परिषद - | १९९८ |

| | | |
|---|---|---|
| २४) | प्राचीन भारतातील स्थापत्य- | १९९९ |
| २५) | जैविक क्रांती व हिंदुत्व - | २००० |
| २६) | प्राचीन भारतातील आहारशास्त्र - | २००१ |
| २७) | प्राचीन भारतातील कला व विद्या- | २००२ |
| २८) | भारतीय संस्कृतीत पाणिनी, भरतमुनी, कौटिल्य, व वात्स्यायन यांचे स्थान - | २००३ |
| २९) | प्राचीन भारतीय वाङ्मयात संवादाचे स्थान - | २००४ |
| ३०) | भारतीय संस्कृतीचे विश्वसंस्कृतीला योगदान - | २००५ |
| ३१) | दर्शनशास्त्रांचा भारतीय संस्कृतीवरील प्रभाव- | २००६ |
| ३२) | भारतीय संस्कृतीतील सृजनशीलता व शोधनावीन्य- | २००७ |

**संस्थेने खालील राज्यांचे अभ्यासदौरे आयोजित केले. तेथील देवळे, वाचनालये, संग्रहालये, ऐतिहासिक वास्तू इत्यादींना भेटी दिल्या.**

१) १९८५ - तामिळनाडू
२) १९८६ - कच्छ व गुजराथ
३) १९८७ - पैठण- तेर-नाशिक
४) १९८८ - कर्नाटक
५) १९८९ - केरळ
६) १९९० - आंध्रप्रदेश
७) १९९१ - ओरिसा
८) १९९२ - राजस्थान

## जागतिक परिषदा

१९८४ साली फिलाडेल्फिया, अमेरिका येथे भरलेल्या ६ व्या जागतिक संस्कृत परिषदेकरिता व १९८७ साली लेडन (हॉलंड) येथे भरलेल्या ७व्या जागतिक संस्कृत परिषदेकरिता, संस्था सुमारे २५ प्रतिनिधी घेऊन गेली होती. १९९० साली व्हिएन्ना (ऑस्ट्रिया) येथे भरलेल्या ८व्या जागतिक संस्कृत परिषदेला,१९९४ साली मेलबोर्न, ऑस्ट्रेलिया येथे भरलेल्या ९व्या जागतिक संस्कृत परिषदेला, २००० साली तुरिनो इटाली येथे भरलेल्या जागतिक संस्कृत परिषदेला तसेच २००६ साली एडिंबरो (यू.के) येथे भरलेल्या १३व्या जागतिक संस्कृत परिषदेला डॉ. विजय बेडेकर हे उपस्थित होते. व २००२ साली अफगाणिस्थानच्या दौऱ्यात संस्थेमार्फत संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर सहभागी झाले होते.

## शिक्षक व विद्यार्थी - देवाणघेवाण कार्यक्रम

२००३ सालापासून एल्.ई.सी.टी.(League of Exchange of Comonwealth Teachers, LECT) व प्राच्यविद्या अभ्यास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ब्रिटिश शिक्षकांचा, भारतीय प्राथमिक व माध्यमिक शिक्षण

पद्धतीचा अभ्यास करण्याकरिता, शाळांच्या भेटीचे आयोजन केले जाते.

गेल्या पाच वर्षांत म्हणजे २००३ ते २००७ या कालावधीत सुमारे १५० ब्रिटिश शिक्षकांनी या योजने अंतर्गत भेटी दिल्या. २००४ सालापासून भारतीय शिक्षकांनीही ब्रिटिश शिक्षण पद्धतीचा अभ्यास करण्याकरिता इंग्लंडमध्ये जाऊन ब्रिटिश शिक्षण संस्थाना भेटी दिल्या. सुमारे ५० भारतीय शिक्षकांनी लंडन, ऑक्सफर्ड, वेस्ट ससेक्स व बर्मिंगहॅम या शहरातील शाळांना भेटी दिल्या.

याचबरोबर २००५ सालापासून विद्यार्थ्यांकरिता ऑक्सफर्ड, केम्ब्रिज व लंडन येथील महाविद्यालये, ग्रंथालये, संग्रहालये व भारतीय संस्कृती आणि स्वातंत्र्यलढ्याशी संबंधित स्थळांना भेटी देण्यास सुरुवात केली. या योजने अंतर्गत सुमारे ४० भारतीय विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या.

चीनमधील युनान प्रांतातील कुनमिन या गावात चीन सरकारतर्फे आयोजित केलेल्या शालेय विज्ञान प्रदर्शनात कै. आनंदीबाई के. जोशी या इंग्रजी माध्यम शाळा, ठाणे या शाळेच्या चार विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

अशा प्रकारचे, विद्यार्थी व शिक्षकांसाठी शैक्षणिक व सांस्कृतिक अभ्यास दौरे आयोजित करणारी प्राच्यविद्या अभ्यास संस्था, ठाणे ही महाराष्ट्रातील एकमेव संस्था आहे. या संदर्भात अधिक माहिती संस्थेचे कॉम्प्यूटरवरील संकेत स्थळ http//:www.orientalthane.com येथे उपलब्ध आहे.

## प्रदर्शने व इतर कार्य

१) १९८५ : ठाणे शहराचा २ हजार वर्षाचा इतिहास दाखविणारे प्रदर्शन.

२) १९८६ : मराठीतील कोशवाङ्मयाचे प्रदर्शन व त्याच वेळी भारत सहकारी बँकेच्या सहकार्याने रु. १५,०००/- पर्यंत पुस्तक खरेदीकरिता माफक व्याज दराने कर्जपुरवठा. यामुळे उद्युक्त होऊन २००च्या वर अभ्यासक इंग्रजी व मराठी कोष खरेदी करू शकले.

३) १९८८ : डॉ. शेषगिरिराव यांच्या संपादकत्वाखाली तयार होत असलेल्या Encyclopaedia of Hinduism या प्रकल्पाची पश्चिम विभागीय बैठक संस्थेने ठाणे येथे भरविली. सुमारे ५० अभ्यासकांनी त्यामध्ये भाग घेतला.

४) १९८९ : मणिपुर व नागालँड येथील तरुणांकरिता भारतीय संस्कृतीचा परिचय व अभ्यासाकरिता येऊर येथे ३ आठवड्यांचे शिबिर.

५) १९८९ : शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांची 'शिवाजी व राष्ट्र-उभारणी' यावर आठवडाभर व्याख्यानमाला.

६) १९९० : एक वर्षाचा योग-आयुर्वेद पदविका अभ्यासक्रम.

७) १९९० : मुंबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियमच्या सहकार्याने पर्यावरणावर प्रदर्शन.

८) १९९१ : भारत सरकारच्या फिल्म्स् डिव्हिजन व संस्थेच्या संयुक्त विद्यमाने भारतीय संस्कृतीवर आधारित माहिती/वृत्त चित्रपटांचा आठवड्याचा चित्रपट महोत्सव 'परंपरा'. सुमारे २० दुर्मिळ व दर्जेदार चित्रपट यावेळी दाखविण्यात आले.

९) १९९२ : अभ्यास सहलींच्या फोटोंचे प्रदर्शन.

१०) १९९४ : कोशवाङ्मय प्रदर्शन.

११) १९९७ : द्वितीय बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्या परिषदेचे आयोजन.

११) १९९९ : 'शिक्षण' या विषयावरील ग्रंथांचे प्रदर्शन.

१२) २००० : हस्तलिखितांचे प्रदर्शन.

१३) २००१ : व्याकरण ग्रंथांचे प्रदर्शन.

१४) २००४ : डॉ. मो. दि. पराडकर यांच्या अमृतमहोत्सव प्रसंगी डॉ. पराडकर गौरव ग्रंथाचे डॉ. टी. आर. धर्माधिकारी, माजी अध्यक्ष, वैदिक संशोधन मंडळ, पुणे यांचे हस्ते प्रकाशन.

१५) २००५ : हस्तलिखितांचे प्रदर्शन.

१६) २००५ : मॅन्यूस्क्रिपट रिसोर्स सेंटर म्हणून नॅशनल मिशन फॉर मॅन्यूस्क्रिपर्ट, नवी दिल्ली यांची मान्यता.

१६) २००६ : दुर्मिळ ग्रंथ व हस्तलिखितांचे प्रदर्शन.

१७) २००६ : डॉ. मो. दि. पराडकर यांच्या ८१व्या वाढदिवसानिमित्त सत्कार समारंभ.

१८) २००६ : रॉयल एशियाटिक सोसायटी, लंडन यांची 'फेलोशिप' मिळाल्याबद्दल डॉ. विजय बेडेकर, संस्थेचे अध्यक्ष, यांचा सत्कार समारंभ.

१९) २००७ : संस्थेचे मान्यवर नाणेतज्ज्ञ श्री. शशिकांत धोपाटे, ठाणे यांचा, त्यांना कै. परमेश्वरीलाल गुप्ता, पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार समारंभ.

अनेक मान्यवर व्यक्तींकडून संस्थेला ग्रंथरूपाने देणगी मिळाली आहे. त्यातील काही देणगीदारांचा उल्लेख करीत आहोत. संस्था देणगीदारांची आभारी आहे.

| | | |
|---|---|---|
| ❋ कै. देवराज पाटील | ❋ कै. सं. प. देसाई | ❋ श्री. मनोहर बागवेकर |
| ❋ ख्रिस्तवासी जॉर्ज मोराइस | ❋ श्री. रा. चिं. ढेरे | ❋ कै. त्र्यं. वि. गुणे |
| ❋ कै. पाटणकर, राजापुर | ❋ कै. स. अं. डांगे | ❋ डॉ. वि. म. कुलकर्णी |
| ❋ कै. पंढरीनाथ देशमुख | ❋ श्रीमती सिंधू डांगे | ❋ कै. पंढरीनाथ प्रभू |
| ❋ श्रीमती शैलजा निबांळकर | ❋ डॉ. शरदचंद्र कोपर्डेकर | ❋ कै. गणेशशास्त्री शेंड्ये |
| ❋ श्री. कृष्ण अर्जुनवाडकर | ❋ श्री. वा. ल. मंजूळ | ❋ डॉ. एस्. आर. शर्मा |

याशिवाय गेल्या २५ वर्षांत १५० वर देशातील अभ्यासकांची व १५ ते २० परदेशातील अभ्यासकांची विशेष व्याख्याने संस्थेने आयोजित केली होती. गेल्या २५ वर्षांत संस्थेने केलेल्या कामाचा आढावा, संस्थेच्या कामाची व्याप्ती आपल्या निदर्शनास यावी म्हणून वर दिला आहे. हे कार्यक्रम अनेक हितचिंतक व निःस्वार्थीपणे, सेवाभावाने काम करणाऱ्या व्यक्तींमुळेच शक्य झाले. संस्थेला कुठल्याही सामाजिक संस्थेची वा सरकारी, मदत किंवा अनुदान नाही. आपल्या सद्भावना आमच्या पाठीशी उभ्या आहेत. प्राच्यविद्येच्या अभ्यासाकरिता लागणाऱ्या साधनांची उपलब्धता ठाणे शहरामध्ये करणे ही निकडीची गरज आहे. यातील प्रमुख साधने म्हणजे संदर्भ ग्रंथालये व वस्तुसंग्रहालय. या दोघांच्या उभारणीकरीता अर्थसहाय्याची, आपल्या मदतीची गरज आहे. आपण किती मदत करू शकता याचे आपणच जाणकार आहात. सढळ हाताने आपण या प्रकल्पांना मदत करावी ही आमची आपणांस कळकळीची विनंती आहे.

१) आपण संस्थेला आर्थिक मदत करू शकता.
२) आपल्याकडील पुस्तके, पोथ्या व वस्तू संग्रहालयाला देणगी म्हणून देऊ शकता.
३) अशा वस्तू वा संग्रह असलेल्या व्यक्ती आपणास माहीत असल्यास संस्थेला त्या वस्तू वा पुस्तके देण्याकरिता आपण त्या व्यक्तीला किंवा संस्थेला उद्युक्त करू शकता.
४) शहराचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना अशा प्रकल्पांना मदत करण्याकरिता विनंती करू शकता.
५) वेळोवेळी होणारे संस्थेचे कार्यक्रम, सहली, चर्चासत्रे, भाषणे यांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होऊ शकता.

संस्थेचा विकास म्हणजेच पर्यायाने शहराचा व आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास.

धन्यवाद,

आपला नम्र.

विजय बेडेकर

(डॉ. विजय बेडेकर)